**पुणे शहरांत मागील महिन्यात घडलेल्या चैन स्नॅचिंगच्या गुन्हयांना आळा घालून सदर गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याचे पोलीस आयुक्त, श्रीमती रश्मी शुक्ला यांनी सक्त आदेश दिले होते.**

---

पुणे शहरांतील हडपसर पो.स्टे.गुन्हा रजि.नं.१०९७/२०१७ भा.दं.वि.क.३९२,३४ या गुन्हयाचा युनिट-५ कडील अधिकारी व कर्मचारी असे समांतर तपास करीत असतांना पो.ना. ७०१६ जोगदंडे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मांजरी रोडला चैन चोरी करणारे गुन्हयातील श्रीरामपुर भागातील आरोपी कंबर ऊर्फ डंपर इराणी हा लोणी टोल नाक्याजवळील द्राक्ष संशोधन केंद्राजवळ,पुणे येथे संशयित रित्या काळे रंगाचे पल्सर गाडीवर वावरत आहे व त्याने लाल रंगाचा टी शर्ट त्यावर खाकी रंगाचे हिवाळी जॅकेट व काळपट रंगाची ट्रॅक पॅन्ट घातली आहे अशी माहिती मिळालेने सदरबाबत मा.प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण,युनिट-५, गुन्हे शाखा,पुणे शहर यांना कळविली असतां त्यांचे दिमतीत त्यांनी स्वतः व युनिट-५ कडील अधिकारी व सर्व पोलीस स्टाफ यांनी मा.वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शनपर आदेश व सुचना प्रमाणे बातमीदारांसह मिळाले बातमीचे अनुषंगाने सापळा रचून आरोपी नामे **कंबर ऊर्फ डंपर शहाजान जाफरी/ इराणी वय-३२वर्षे,धंदा-काही नाही रा-सध्या-पठारे वस्ती,इराणी मशिद मागे,मोहसिन इराणी यांचे घरी भाडयाने,लोणी काळभोर ता.हवेली जि.पुणे मूळ रा.मुपो.वार्ड नं.१,नविन कोर्ट समोर,इराणी वस्ती, श्रीरामपुर जि. अहमदनगर** यांस त्यांचेकडे असलेले काळे रंगाचे पल्सर मो.सा.नं.एमएच१६/बीजे-४३९० वाहनांसह ताब्यांत घेवून त्याचेकडे तपास करतां त्याने व त्याचा साथिदारांसह असे दोघांनी मिळुन यापुर्वी साधारण ०५ महिन्यांपूर्वी डेक्कन भागांतील एका गल्लीतून काळे रंगाची बजाज पल्सर सायकलची चोरी करुन साधारण ०८ ते १० दिवसापुर्वी मांजरी रोडला सायंकाळी पायी जाणारे एका महिलेच्या गळयातील मंगळसुत्र खेचुन पळुन गेलो होतो अशी कबुली दिलेली आहे.

त्याचेकडून चैन स्नॅचिंग व पोलीस बतावणीचे गुन्हे करण्यांकरिता वापरलेली कि.रु.१,००,०००/- ची एक पल्सर मो.सायकल काळे रंगाची एमएच१६/बीजे-४३९० ही डेक्कन पोलीस स्टेशनकडील गुन्हा रजि. नं.११५/१७ भा.दं.वि.क.३७९ प्रमाणे मधील जप्त करणेत आलेली आहे.

वरील आरोपी कंबर ऊर्फ डंपर शहाजान जाफरी / इराणी व त्याचा साथीदार असे दोघांनी मिळुन खालीलप्रमाणे एकुण ०४ गुन्हे उघडकीस आणुन माल जप्त करण्यात आला आहे.

१) हडपसर पो.स्टे.गुन्हा रजि.नं.१०९७/२०१७ भा.दं.वि.क.३९२,३४ **चैन चोरी** ( कि.रू.४५,०००/- मिनी गंठण )
२) विश्रांतवाडी पो.स्टे.गुन्हा रजि.नं.३२५/२०१७ भा.दं.वि.क. ३९२,३४ **चैन चोरी** ( कि.रू.२४,०००/- चपटी चैन )
३) दिघी पो.स्टे.गुन्हा रजि. नं.२२२/२०१७ भा.दं.वि.क.१७०,४२०,३४ **पोलीस बतावणी** ( कि.रु.१५,०००/- रोख रक्कम व सोन्याची अंगठी )
४) डेक्कन पो.स्टे.गुन्हा रजि.नं.११५/२०१७ भा.दं.वि.क.३७९ **वाहन चोरी** ( कि.रू.१,००,०००/- एक बजाज पल्सर)

एकुण १,८४,०००/- चा माल

दाखल गुन्हयाचे तपासांमध्ये अटक आरोपींचा सिंहगड रोड,वारजे माळवाडी,अलंकार,कोथरुड,डेक्कन, चतुःश्रृंगी भागांत सतत वावर असल्याचे निष्पन्न होत असून त्या भागांतील देखील चैन स्नॅचिंग सारखे गुन्हे तपासांत उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे, पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.पंकज डहाणे, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री.संजय निकम यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण,सपो.निरी.युवराज नांद्रे,पो.उ.निरी.श्री.अकील शेख,स.पो.फौज.लक्ष्मण शिंदे,पो.हवा.संतोष मोहिते,माणिक पवार,प्रविण शिंदे,सचिन घोलप,प्रदीप सुर्वे,सिध्दराम कोळी,राजेश रणसिंग,केरबा गलांडे,पो.ना.अंकुश जोगदंडे,अमजद पठाण,,महेश वाघमारे,प्रविण काळभोर,प्रमोद घाडगे,गणेश बाजारे,नामदेव आंगज यांनी ही कामगिरी केलेली आहे. **सदरच्या गुन्हयांचा तपास युनिट-५ कडील सहा.पोलीस निरिक्षक श्री.युवराज नांद्रे हे करीत आहेत.**


पुणे शहर पोलीस
गुन्हे शाखा, युनिट १, ची कामगिरी


पुणे शहर पोलीस
गुन्हे शाखा,
युनिट १,
ची कामगिरी